MHAH160011252024

## निशाणी १६ खालील आदेश

( अश्विनी गावंडे वि. दिनेश गावंडे )

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी सामनेवालांविरुध्द कौटुंबिक हिंसाचापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम १२, १८, १९, २० व २२ नुसार दाखल केलेला आहे. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्ज निशाणी १६ न्यायप्रविष्ठ करून विनंती केली आहे की, प्रस्तुत प्रकरण मिटविणेसाठी मध्यस्थी केंद्राकडे असल्याने तसेच काही महत्त्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने सामनेवालास म्हणणे देता आले नाही. त्यामुळे सामनेवालाविरूध्द मे. कोर्टाने नो.डब्लु.एस चा आदेश दिलेला आहे.

२. तरी सदर अर्जात सामनेवालाची बाजू मांडून सत्य परिस्थिती मे. कोर्टासमोर आणणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे असल्याने सामनेवाला विरूध्द झालेला नो.डब्लु.एस चा हुकूम सेट असाईड करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवित म्हणणे दिले आहे की, सामनेवालाने अर्जात दिलेले कारण खरे नाही, संयुक्तीक नाही. सामनेवाला हा हेतुपुरस्कर मे. कोर्टात हजर राहुन देखील म्हणणे दिले नाही तसेच मध्यस्थी केंद्राकडे देखील हजर राहिला नाही. सबब, अर्ज रद्द करण्यात यावा. यदाकदाचित अर्ज मंजूर करावयाचा असे मे. कोर्टाचे मत झालेस सामनेवाला यांना प्रत्येकी १,०००/– रूपये कॉस्टचा हुकुम व्हावा अशी विनंती केली आहे.

४. सामनेवाला यांनी न्यायप्रविष्ठ केलेला अर्ज अभ्यासला. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी सामनेवालांविरुध्द कौटुंबिक हिंसाचापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम १२, १८, १९, २० व २२ नुसार दाखल केलेला आहे. सामनेवाला यांनी त्यांचे म्हणणे अर्जाकामी वेळेत न दिलेने सामनेवाला

यांचेविरुध्द विना म्हणणे आदेश पारीत झाला आहे. मुळ अर्जाचे स्वरुप लक्षात घेता अर्जाच्या योग्य त्या निर्गतीकरिता सामनेवाला यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल असणे गरजेचे आहे. थोडक्यात त्यांचेविरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन त्यांना म्हणणे देण्यास संधी देणे न्यायोचित ठरेल. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांचेविरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाबाबत काही आदेश नाही.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.06.22 17:12:11 +0530

दिनांक २२.०६.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, या पी.डी.एफ फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | एस. पी. पालवे,<br>लघुलेखक (श्रेणी – ३) |
| न्यायालयाचे नाव | – | अनंत रा. टेंगसे,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोर्ट नं. २, अकोले. |
| आदेश दिनांक | – | २२/०६/२०२६ |
| न्यायदंडाधिकारी सही | – | २२/०६/२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | – | २२/०६/२०२६ |